भारती विदयापीठ पोलीस ठाणे
दिनांक-१०/११/२०१७

# प्रेसनोट

## काञज परिसरात घरफोडी चोरी करणारी रेकॉर्डवरील महीला अटकेत

भारती विदयापीठ पोलीसांची कामगिरी

दि.०६/११/२०१७ रोजी भारती विदयापीठ पोलीस ठाणे हददीत होणारे घरफोडयांना प्रतिबंध व्हावा म्हणुन मा.वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांचे आदेशावरुन पोलीस ठाणे हददीत पो.उप-निरी शिवदास गायकवाड हे त्यांचे पथकासह पेट्रोलींग करीत असताना **पोलिस कर्मचारी सुमित मोघे** यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, पुणे शहरात विविध ठिकाणी घरफोडी चो-या करणारी रेकॉर्डवरील महीला आरोपी लक्ष्मी अवघडे हिने दोन दिवसापुर्वी राजस सोसायटी भागातील एका बंगल्यामध्ये घरफोडी चोरी केलेली असुन त्यातील काही सोने ती विकणेसाठी त्रिमुर्ती चौक आंबेगाव बु।। येथे येणार आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाल्याने त्यांनी ताबडतोब सदरची माहीती श्री कमलाकर ताकवले सो वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो व राजकुमार वाघचवरे पोलीस निरीक्षक (गुन्हे) भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांना कळवून बातमीच्या ठिकाणी जावुन सापळा लावुन वॉच केला असता बातमीत मिळालेले ठिकाणी बातमीतील महीला थांबलेली असल्याचे दिसल्याने बातमीप्रमाणे महीला स्टाफचे मदतीने तिस जागीच पकडुन आहे त्या स्थितीत ठेवुन तिचे नाव पत्ता विचारले असता तिने नाव पत्ता **लक्ष्मी संतोष अवघडे ऊर्फ लक्ष्मी विक्रम भिसे वय.३० वर्ष रा. मु.पो.नाडे नवारस्ता ता.पाटण जि.सातारा** असे सांगितल्याने तिस ताब्यात घेवून महीला पोलिसामार्फतीने अंगझडती घेता तिचे अंगझडती मध्ये एक नेकलेस व दोन कानातील टॉप्स, मिळुन आल्याने तिचेकडे अधिक तपास करून त्याबाबत दाखल असलेला गु.रं.नं-५१८/२०१७ भा.द.वि कलम ४५४,४५७,३८० या दाखल गुन्हयात तिस दि.०६/११/२०१७ रोजी ११/५० वा अटक करून मे.ह्यार कोर्टात हजर करून पोलिस कस्टडी मध्ये अधिक तपास करता तिने घरफोडीचे आणखी गुन्हे केल्याचे कबुल केल्याने अधिक तपासात तिचेकडून एकूण १०२ ग्रॅम सोन्या-चांदीचे दागिने असा एकुण कि.रू ३,११,७००/- चा माल जप्त करून घरफोडी चोरीचे एकुण तीन गुन्हे उघडकीस आलेले आहेत.

सदरची महीला आरोपी ही घरफोडी रेकॉर्डवरील आरोपी असून तिचेवर पुणे शहरात विविध पोलीस ठाणेस घरफोडीचे गुन्हे दाखल आहेत.दाखल गुन्हयाचा पुढील तपास तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री.शिवदास गायकवाड हे करीत आहेत.

**सदरची कारवाई मा.श्री रविंद्र सेनगावकर सो,अप्पर पोलीस आयुक्त दक्षिण प्रादेशिक विभाग पुणे, मा.श्री डॉ.प्रविण मुंढे सो पोलीस उप-आयुक्त परि-२ पुणे, मा.डॉ.शिवाजी पवार सो सहा.पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग पुणे, मा.श्री कमलाकर ताकवले सो, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, राजकुमार वाघचवरे पोलीस निरीक्षक (गुन्हे), भारती विदयापीठ पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी पो.उप-निरीक्षक श्री.शिवदास गायकवाड, पोलीस कर्मचारी प्रदीप गुरव, विनोद भंडलकर,गणेश सुतार, भिमराव पुरी, समीर बागसिराज,बाबा नरळे, योगेश सुळ, सुमित मोघे,विक्रम खिलारे,अजित कोकरे,महीला कर्मचारी राणी शिंदे,सोनाली झगडे यांचे पथकाने केलेली आहे.**